# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०२/२०२५ (शनिवार )**

## आंतरराज्य सिमेवरील गावांमध्ये नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस आणि छिंदवाडा पोलीस,राज्य मध्यप्रदेश यांचे संयुक्तीक कोबिंग ऑपरेशन

दिनांक.०७/०२/२५ रोजी २३/०० वा ते दि.०८/०२/२५ चे ०४/०० वा. पावेतो तोतलाडोह बॅक वॉटर परीसरात महाराष्ट्र व मध्यप्रदेश सिमेवरील गावात सयुक्तीकरित्या कोंबींग ऑपरेशन राबविण्यात आले त्यात मध्यप्रदेश येथील गाव: खमारपाणी,पुपूलडोह, दुधगांव, मारजतपूर आणि छेडीया या गावामध्ये प्रभावीपणे कोंबिंग ऑपरेश मोहीम राबविण्यात आले त्यात तोतलाडोह येथे अवैध मासेमारी करणारे एकूण ५७ मासेमारांना तपासण्यात आले असता घरी हजर मिळून आले, दरम्याण तोतलाडोह धरणात अवैध प्रकारे मासेमारी करणारे कोणीही आढळून आले नाही. तसेच पोस्टे देवलापार येथे दाखल अप.क्र १४/२५ ३२६(ड),३(५)भा.न्या.स सहकलम ४ सा.सं.नु.अधिनिय गुन्हयातील वनविभागाच्या बोटी जळाल्यासंर्भाने मासेमारी करणाऱ्यांकडे अधिक चौकशी करण्यात आली. तसेच पोस्टे देवलापार (महाराष्ट्र) हद्दीतील एकुण २१ मासेमारी करणाऱ्यांना तपासण्यात आले असता घरी हजर मिळून आले. तसेच पोस्टे देवलापार येथे कोंबिंग ऑपरेशन दरम्याण अवैध दारूबंदी कायदया अंतर्गत ०२ केसेस, आरोपी नामे: शफिक रफीक पठाण वय ३३ वर्ष,रा:डोंगरताल ता.रामटेक जि.नागपूर याचा विरोधात पोस्टे ला कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्यात आली, BW वारंट –०४ बजावण्यात आले, पोस्टे रेकॉर्ड वरील १० गुन्हेगार तपासण्यात आले. तसेच पोस्टे देवलापार येथे नाकांबदी दरम्याण वाहतूक कायदया अंतर्गत १० केसेस करण्यात आली संपूर्ण कोंबींग ऑपरेश मोहिम मा. श्री.हर्ष ए.पोद्दार, पोलीस अधिक्षक ,नागपूर ग्रामीण जिल्हायांचे मार्गदर्शनात .श्री.रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी ,रामटेक उपविभाग,पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण,पोलीस निरीक्षक श्री. राजेश थोरात, ठाणेदार पोलीस

स्टेशन पारशिवनी, सपोनि श्री. नारायण तुरकुंडे ठाणेदार देवलापार, सपोनि श्री.स्नेहल राउत ठाणेदार अरोली, सपोनि श्री.किशोर शेरकी, स्थानिक गुन्हे शाखा, सपोनि श्री. मनोज गदादे स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा, श्री. भगतसींग ठाणेदार, चांद ,मध्यप्रदेश, श्री. मरस्कोल्हे ठाणेदार बिछवा, मध्यप्रदेश तेथील ०६ पोलीस अमलदार तसेच नागपूर ग्रामीण येथील एकुण ३० पोलीस अमलदार व ०१ आरसीपी पथक यांनी कोंबिंग ऑपरेश मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.









## मोबाईल वरून क्रिकेट सट्टा / बेटिंग लावुन जुगार खेळविणाऱ्यांवर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०६/०२/२०२५ रोजी श्री अनिल मस्के यांच्या मार्गदर्शनात उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालयातील स्टाफ आणि सावनेर पोलीस स्टेशनचा स्टाफ अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की पोलीस ठाणे सावनेर हद्दीतील मौजा तेलकामठी येथे एक इसम शेतात बसुन त्याच्या जवळील मोबाईल मध्ये अॅप वरून भारत विरूध्द इंग्लंड एकदिवसीय क्रिकेटवर लोकांसोबत फोन वर बोलुन क्रिकेट वर जुगार चालवित आहे. मिळालेल्या माहीतीच्या सावनेर पोलीस हे घटनास्थळी गेले असता त्यांना १) नावेद शब्बीर शेख वय २३ रा वार्ड क्र १२ जामा मज्जीद मागे,सावनेर हा दिसला.तो पोलीसांनी पाहुन पळु लागला पोलीसांनी आरोपीला शिताफिने पकडले. आरोपीला विचारपुस केल्यावर त्याच्या कडुन महीती मिळाली की,आरोपी क्र १) सदर जुगार हा, आरोपी क्रं २) जाबीर शेख रा वार्ड क्र १२ जामा मज्जीद मागे सावनेर यांच्या सांगण्यावरून कमिशन मध्ये खेळवत आहे. आरोपीच्या ताब्यातुन सॅमसन्ग कंपीनचा अॅन्ड्रॉईड मोबाईल हॅन्डसेट कि, ४०,०००/—रूपये, २) लावा कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट कि

१,००० /—रू, ३) रॉयल ईनफिल्ड कंपनीची मोटर सायकल क्र एम एच ४० सीके ८५३२ कि १,२०,०००रू असा एकुण १,६१,००० रू /—माल मिळुन आला मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन १) नावेद शब्बीर शेख वय २३ रा वार्ड क्र १२ जामा मज्जीद मागे सावनेर,२)जाबीर शेख रा वा क्र १२ जामा मज्जीद मागे सावनेर, यांच्या विरुद्ध कलम १२(अ) म. जू. का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— ०७/०२/२०२५ रोजी चे ००/०५ ते ००/१५ वा. कन्हान पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हे त्यांच्या स्टाफ सह रात्रगस्त व ऑलआउट ऑपरेशन करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की टेकाडी येथे राहणारा एका इसमाने सोशल मिडीयावर हातात धारदार चाकु घेवुन व्हीडीओ काढुन पोस्ट केला आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भितीचे वातारण निर्माण झाले आहे. त्यानुसार साई मंदीर मागे कन्हान येथे पंचासमक्ष जावुन पाहणी करून पंचासमक्ष विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या ताब्यातुन **एक धारदार लोखंडी चाकु ज्याची मुठासह लांबी १४ इंच ,मुठ ४ इंच लांब वपात्याची लांबी १० इच व रूदी २.५ इंच अंदाजे किंमत ५००/—रू. असा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.**

विधीसंघर्ष बालका **विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करीत आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर